# Historicity

International Research Journal

Chief Patron

Dr Vasant Shinde

Director Vice-Chancellor
Deccan College, Deemed University, Pune, Maharashtra

Editor-In-Chief

[illegible]

M.H.Mahadik Arts and Commerce College, Modnimb, Solapur, Maharashtra

Editor

Dr Ravikiran Jadhav

D.B.F Dayanand College Of Arts & Science, Solapur, Maharashtra


**Contact Us:**
Dr. Sanjay Gaikwad
40-D, New Santosh Nagar, Vijapur Road, Solapur-413004
Call us on : +91-9422460023 / +91-9850078760
Email Us : g.sanjaylee@gmail.com
ravikiran.mj@gmail.com
historicityindia@gmail.com
Website : www.lbp.world



Phone No. : +91-9595 359 435 /0217-2372010
Email ID : ayisrj2011@gmail.com
Webbsite : www.lbp.world



ISSN : 2393-8900


# Historicity

International Research Journal

UGC APPROVED



Editor-in-Chief
Dr. Sanjay Gaikwad

(4)

# Historicity

## International Research Journal

# Certificate of Publication

Impact Factor : 1.9152(UIF)

ISSN 2393-8900

*This is to certify that our Editorial, Advisory, and Review Board Accepted Research Paper of* गुजर विजय भगवान *Topic:-* राजर्षी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्योध्दाराचे *The Research paper is Original & Innovative it is Done Double Blind Peer Reviewed. Your Article is Published in The Month of October Year 2017.*

**Editor-in-Chief**

**Sanjay Gaikwad**

ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 2 | OCTOBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्योध्दाराचे कार्य

**प्रा.गुजर विजय भगवान**
**इतिहास विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज .**

**प्रास्ताविक :—**



आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचा बहुमोल वाटा आहे. बहुजन समाजाचा उध्दार करणाऱ्या महात्मा फुल्यांचा वारसा चालविणारा राजा म्हणून महाराष्ट्राच्याच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतिहासात त्यांचे एक महत्वपूर्ण स्थान आहे. राजर्षीशाहू महाराजांनी कोल्हापूर गादीची सुत्रे हाती घेताच आपल्या रयतेला दिलासा देणारा जाहिरनामा प्रसिध्द केला. महाराजांनी जनकल्याणाचा जणू विडाच उचलला होता. त्यासाठी बहुजन समाजात जागृती झाली पाहिजे. या उद्देशाने प्रेरित होऊन खास करुन वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी आपल्या सामाजिक कार्याकडे प्रकर्षाने लक्ष घातले. त्यामध्ये त्यांनी अस्पृश्य निवारणाचे कार्य मोठया प्रमाणावर केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अस्पृश्य निवारण कार्यास गती मिळाली. प्रस्तुत शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण विषयक केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**राजर्षी शाहू महाराजांचे पूर्वचरित्र :—**

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म दि. २६ जुलै १८७४ रोजी सौ. राधाबाई व जयसिंगराव उर्फ आबासाहेब या दाम्पत्याच्या पोटी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. पुढे त्यांना दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या राणीसाहेब आनंदीबाईंनी दत्तक घेतले. कोल्हापूर संस्थानाने महाराजांच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केलेली होती. महाराजांचे शिक्षक म्हणून स्टुअर्ट मिंटफोर्ड फ्रेजर यांची दि. २२ मे १८८९ रोजी नेमणूक करण्यात आली. महाराजांनी इंग्रजी भाषेमध्ये प्राविण्य मिळवले. दि.०२ एप्रिल १८९४ ला त्यांनी कोल्हापूर गादीचा कारभार आपल्या हाती घेतला. खऱ्या अर्थाने कोल्हापूर राज्याचे ते छत्रपती झाले. महाराजांनी आपल्या राज्याभिषेक समयी बंद असलेला 'राज्याभिषेक शक' पुन्हा चालू केला.

**संस्थानातील अस्पृश्योध्दाराचे कार्य :—**

महाराजांनी इ.स. १९१८—१९ या कालखंडात आपल्या संस्थानातून अस्पृश्यता उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे अनेक आदेश काढण्यास सुरुवात केली. पुढे अस्पृश्यता निर्मुलन परिषदेचे अधिवेशन माणगाव येथे दि. २१ मार्च १९२० रोजी आयोजित करण्यात आलेले होते. या परिषदेचे अध्यक्षस्थान राजर्षीशाहू महाराज यांनी भूषविले. महाराजांनी स्वत: मानवतेला काळिमा फासणाऱ्या चाली.—रिती, रुढी—परंपरा पाहिलेल्या होत्या. महाराजांनी या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणामधून अस्पृश्यव्यवस्थेविषयी कळवळा व्यक्त केला. गाव कामगार व अधिकारी यांची गरीब

जनतेवरील जबरदस्ती न होण्यासाठी उपाय आखले. विना मोबदला काम करुन घेण्याच्या प्रथेस आळा बसविला. महाराजांनी फक्त घोषणा व आश्वासने दिली नाहीत तर त्यांनी दि.६ सप्टेंबर १९१९ रोजी एक जाहिरनामा प्रसिध्द केला. या जाहिरनाम्या नुसार सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, विश्रामगृह, सरकारी अन्नछत्र, नदी, विहीरी इ. ठिकाणी अस्पृश्यता हा विटाळ मानू नये, आणि जर अशा स्वरुपाची घटना घडली तर त्या घटनेसाठी जबाबदार म्हणून गाव पाटील, तलाठी यांना जबाबदार धरले जाईल असेही नमूद करण्यात आले.

**अस्पृश्य समाजासाठी शिक्षणविषयक आदेश :—**

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजात शिक्षण प्रसार करण्यासाठी निवडक आदेशाद्वारे प्रयत्न केले. त्यावेळी कोल्हापूरात चांभार, महार वगैरे अस्पृश्य लोकांसाठी एक 'रात्रीची शाळा' होती. ती शाळा दि. २८नोव्हेंबर १९०६ च्या आदेशाने महाराजांनी कायम केली. तसेच दि. ४ ऑक्टोबर १९०७ च्या एका आदेशान्वये कोल्हापूरातील चांभार व ढोर या अस्पृश्य समाजातील 'मुलींच्या शाळेसाठी' मंजूरी देण्यात आली. व या शाळेसाठी दरवर्षी ९६ रु. खर्चाची तरतूदही संस्थानच्या स्त्री शिक्षणाच्या अंदाज पत्रकात करण्यात आली. सन १९०९ भास्करराव जाधव यांनी स्थापन केलेल्या अस्पृश्यांच्या वस्तीगृहास इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन दिली.त्या संदर्भात काढलेल्या आदेशात महाराज म्हणतात, ''सर्व अस्पृश्य मानलेल्या लोकांची स्थिती सुधारण्यास विद्याप्रसाराशिवाय दुसरे बलवान साधन नाही.''

**अस्पृश्यांसाठी शैक्षणिक सुधारणा :—**

संस्थानातील अस्पृश्यांसाठी राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक सुविधा निर्माण करुन दिल्या. महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी "विद्याप्रसारक मंडळ" नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेची जबाबदारी भास्करराव जाधव यांच्यावर सोपवली. संस्थानात सन १८९४ साली अस्पृश्यांसाठीच्या शाळांची संख्या ५ तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फक्त १६८ होती. मात्र १९०७—०८ साली शाळांची संख्या १६ तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४१६ पर्यंत गेली. सन १९१२ साली शाळांची संख्या २७ तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६३६ वर पोहोचली. महाराजाच्या अथक प्रयत्नाने शाळांची संख्या व अस्पृश्य विद्यार्थी संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. त्याकाळी स्पृश्य व अस्पृश्य शाळांचा अभ्यासक्रमही सारख्या दर्जाचा नव्हता. अस्पृश्याच्या शाळेत चौथी पास झालेल्या मुलाला पात्रता नाही. या कारणास्तव पाचवीत प्रवेश दिला जात नव्हता. त्यासाठी महाराजांनी ही पात्रता मिळवून देण्यासाठी श्रीपतराव शिंदे यांच्या मार्फत खास पात्रता वर्ग चालवून अस्पृश्य विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित न होऊ देण्याचे कार्य केले.

धनंजय किर लिहतात, कोल्हापूरपासून नागपूरपर्यंत अनेक ठिकाणी ज्ञानदीप लावून आणि आपल्या राज्यात सक्तीचे मोफत शिक्षण सुरु करुन शाहू महाराजांनी महाराष्ट्रातील मागास व दलित वर्गाची मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याचा कसून प्रयत्न केला. खरोखर बुध्दानंतर भारतात शाहू महाराज हेच राजा असे होऊन गेले की, जो हरिजन व गिरीजन यांच्या पंगतीस प्रेमाने, निर्भयपणे व उघडपणे जेवला. त्यामुळे राजर्षी शाहू छत्रपती यांना 'महाराचे महाराज' ही बिरुदावली प्राप्त झाली.

**अस्पृश्यांना मोफत शिक्षण :—**

दि.२४ नोव्हेंबर १९११ रोजी सर्वात महत्वाचा आदेश काढला या आदेशानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले याशिवाय अस्पृश्यातील हुशार विद्यार्थ्यांना दरबाराकडून वेळोवेळी खास शिष्यवृत्त्या दिल्या जाऊ लागल्या. दि. ७ एप्रिल १९१९ च्या एका आदेशान्वये अस्पृश्य लोकांची दैन्यावस्था ध्यानी आणून त्यांच्या शिक्षणास उत्तेजन द्यावे. या हेतूने महाराजांनी त्यांना पुस्तके, पाटया, पेन्सिली मोफत देण्यासाठी अडीच हजार रुपये मंजूर केले. त्याच महिन्यात महाराजांनी सुरु केलेल्या तलाठी वर्गातील अस्पृश्य विद्यार्थ्यासाठी दरमहा आठ रुपये प्रमाणे खास शिष्यवृत्त्या जाहीर करण्यात आल्याचे दिसून येते.तसेच दि.२८ सप्टेंबर १९१९ रोजी महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र शाळा बंद केल्याचा आदेश जारी केला त्यात ते म्हणतात,

''करवीर इलाख्यात अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात. त्या सर्व दसऱ्यापासून बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलास सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करुन घेत जावे. सरकारी शाळांतून शिवा– शिव पाळण्याची नसल्याने सर्व जातीच्या व धर्माच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे.'' याशिवाय इ.स. १९२० साली अस्पृश्य लोकांच्या विद्येच्या उत्तेजनाकरिता दरमहा पाच रुपये प्रमाणे आठ शिष्यवृत्त्या सुरु केल्या. त्यापैकी तीन शिष्यवृत्त्या अस्पृश्य मुलींच्यासाठी ठेवल्या गेल्या होत्या.

**राजर्षी शाहूंचा जाती–विरोधी लढा :–**

ब्रिटीश अंमल सर्व हिंदूस्थानामध्ये निर्माण झालेला होता. ब्रिटिशांनी कायद्यासमोर सर्वजन समान या तत्वाचा अवलंब केलेला होता. तरीही भारतीय समाज जातीव्यवस्थेने पोखरलेला होता. जाती बंधने अतिशय प्रखर बनलेली होती. या जातीव्यवस्थेचा अनुभव स्वतः महाराजांनाही आलेला होता. जातीव्यवस्थेचे जू कायमस्वरुपी बहुजनांच्या मानेवर होते. मात्र मानवतेची खरी जाण राजर्षी शाहू महाराजांना होती. म्हणून त्यांनी फक्त भाषण देणे, कायदे करणे आणि अंमलबजावणी न करणे असे न करता त्यांनी घेतलेल्या कार्याची अंमलबजावणी जातीने करण्याचे धोरण अवलंबिले बहूजनांना प्रशासनात कायद्याद्वारे सेवा करण्याची संधी उपलब्ध करुन दिली गेली. बहूजणांना राज्यकारभारात सामावून घेतल्या शिवाय त्यांचा उध्दार होणार नाही याची खात्री महाराजांना पटलेली होती. म्हणून निरर्थकारक असणारी जातीव्यवस्था झुगारुन दिल्याशिवाय जाती–जाती मधील दरी कमी होणार नाही. असा त्यांचा मानस होता.

''उक्ती आणि कृतीमध्ये तसूभरही फरक न करणारा हा राजा माणसातला राजा आणि राजामधील माणूस होय.'' एका प्रस्तावनेत कुलगुरु डॉ. अप्पासाहेब पवार लिहितात,''लोक सुजाण व्हावेत, सुखी व्हावेत,' जातीजातीच्या कारणाने निर्माण झालेली 'कृत्रिम' असमानता नाहीशी व्हावी, समाज गतिमान व्हावा, प्रगत व्हावा म्हणून त्यांनी जीवनभर प्रयत्न केले. असा राजा होणे नाही. सर्वार्थाने तो जनतेचा राजा होता''

राजर्षी शाहूने जातीव्यवस्थेवर खऱ्या अर्थाने प्रहार केले. तळागाळातील माणसाला वर आणण्यासाठी दि.२६ जुलै १९०२ रोजी पन्नास टक्के आरक्षणाचा अध्यादेश काढला. सुशिक्षित आणि पात्र अस्पृश्यवर्गीयांना दरबारात नोकऱ्या दिल्या. महार आणि तलाठी! चांभार अन् नगरपालिकेत अध्यक्ष हे चित्रच स्फूर्तिदायक होते. दि.१५ मार्च १९२० साली मानगाव परिषदेत राजे म्हणाले होते, ''ज्यांना राजकारण करणे आहे त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे वागविले पाहिजे.... तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको, कृतीने जातीभेद मोडून आम्हांस मनुष्याप्रमाणे वागवतील असे पाहिजेत.'' त्यांनी स्वतः ज्या संस्था निर्माण केल्या त्यात जातीभेद न पाळण्याचे अध्यादेश काढले आणि आदेशाचे पालन न करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींवर कडक कारवाई केली. जातीअंतासाठी महाराजांनी जातीविरोधी २२ परिषदा घेतल्या.

**हजेरीच्या अमानुष पध्दतीतून मुक्तता :–**

सरकारने महार, मांग, रामोशी, बेरड, गट्टेचोर, कोळी इ. जातींना गुन्हेगार जमाती ठरवून त्यांच्यावर दररोज पोलिस ठाण्यात हजेरी देण्याचे बंधन लादले होते. निरपराध व्यक्तीलाही फक्त त्या जातीचा असल्यामुळे या अन्यायाला सामोरे जावे लागत होते. महाराजांनी दि. २७ जुलै १९१८ रोजी आदेश काढून ज्याच्यावर गुन्हा दाखल नाही अशा सर्व स्त्री–पुरुषांची हजेरी बंद केली. तसेच गुन्ह्यात शिक्षा झालेल्या व्यक्तीचे वर्तन शिक्षा संपल्यापासूनच पाच वर्ष चांगले राहिल्यास त्यालाही हजेरीतून मुक्त करावे असे म्हटले.

माणगावच्या परिषदेत आपण हजेरी का बंद केली याची मिमांसा करताना म्हणतात. हजेरीमुळे या गरीब लोकांवर गावकामगार व सरकारी अधिकारी फारच जुलूम करीत. गावात बारा आणे मजुरीचा दर असला तरी गैरहजेरीची भिती घालून त्याच्याकडून हे अधिकारी फुकट काम करवून घेत विसाव्या शतकातील ही गुलामगिरी होय.

**वेठबिगारी पध्दत बंदीचा जाहिरनामा :–**

बहुजन समाजातील लोकांना अनेक जाचक बंधनाखाली राबवून घेतले जाते. उदा. वेठबिगारी होय. वेठबिगारी या पध्दतीच्या नावाखाली दलित व पददलित लोकांना विना मोबदला केंव्हाही आणि कोणतेही काम सांगितले जात असत. पूर्वीच्या काळी राजे, महाराजे वेठबिगारीने कामे करुन घेत असत तर कालांतराने राजे—महाराजे यांची जागा गावकामगार, पाटील, कुलकर्णी यांनी घेतलेली होती. वेठबिगारी प्रथम बंद करण्यासाठी एक घटना घडली ती पुढीलप्रमाणे — एक हरिजन व्यक्ती गावकामगाराकडे कामाला होती. एके दिवशी त्याची मुलगी आजारी पडते. म्हणून तो गावकामगाराकडे सुट्टीची याचना करतो, कारण मुलीच्या औषधासाठी कोल्हापूरला जावे लागणार होते. मात्र त्याने सुट्टी देण्यास नकार दिला. सायंकाळी कामावरुन येऊन पाहतो तर त्या मुलीचा औषधा वाचून मृत्यू झालेला असतो. या घटनेची बातमी महाराजांपर्यंत जाते. महाराजांनी त्या हरीजन व्यक्तीस बोलावून त्याचे सांत्वन केले व खर्चासाठी थोडे पैसे दिले आणि ताबडतोब एक जाहिरनामा काढून वेठबिगारी प्रथा कायद्याने बंद करण्यात आली. ( दि.२६ जून १९१८)

**महार वतन खालसा :—**

संस्थानातील सर्व महारकीचे वतन खालसा करुन त्याच्या जमिनी रयतवारी करुन त्यांच्या वतनाच्या जबाबदारीतून कायमचे मुक्त करणे. राजर्षी शाहू महाराजांनी हा निर्णय लगेच अंमलात आणला. प्रत्येक गावच्या वतनदार महार व्यक्तीकडून एक अर्ज भरुन घेतला व त्यावर तातडीने कार्यवाही करुन त्या त्या गावची महार वतने दि.४ मे १९२१ च्या आदेशाने खालसा करुन टाकली. प्रत्येक गावचे महार वतन खालसा करुन राजर्षी शाहू महाराजांनी पुन्हा एकदा सर्व गाव कामगार मंडळींना व सरकारी नोकरांना महाराकडून वेठवरळा न घेण्याचा व घेतल्यास कडक शिक्षा करण्याचा दि.१८ सप्टेंबर १९१८ रोजी हुकूम काढला. महाराष्ट्र शासनाने सन १९५८ साली महार वतने खालसा करून महारांची गुलामगिरीतून मुक्तता केली.

**समारोप :—**

राजर्षी शाहू महाराज हे नुसतेच बोलके समाज सुधारक नव्हते तर त्यांनी प्रत्यक्ष कृती करुन आपल्या संस्थानाबरोबरच महाराष्ट्रात जनहिताच्या दृष्टीने अस्पृश्य समाजाला स्थैर्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी अस्पृश्य समाजास सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

**संदर्भ सूची**


1. साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, कृष्णाजी प्रकाशन, कोल्हापूर २०१३ पान.१८
2. कीर धनंजय, श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, पुष्प पहिले, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मार्च १९७० पान.१६ व १७.
3. भगत रा. तु, श्री शिक्षणाचे शिल्पकार, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर १९९७ पान.४२
4. सूर्यवंशी ग.सु. (डॉ) राजा शाहू आणि समाजप्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी १९७८ पान.१८
5. पवार जयसिंगराव(डॉ) राजर्षी शाहू छत्रपती,: जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, २०१२ पान ६०
6. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २०११ पान ७—८
7. कित्ता, पान.८९
8. सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे १९८४ पान. ३६९ ते ३७५
9. गौतम प्रज्ञावंत (संपा),शाहू राजा, दि राहूल पब्लिकेशन, कोल्हापूर १९९१ पान.१८
10. पानसरे गोविंद (ॲड), राजर्षी शाहू वसा आणि वारसा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर १९९७ पान. १०